
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. ९२५५



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401255
BVBK-0401255

# असा असतो देशभक्त

# कांहीं तरी नवेंच करा:

*********************************

मनुष्य-समाज म्हणजे एक विशाल फुलबाग आहे.
इथलीं कांहीं झाडें मधुर फळें देतात.
कांहीं झाडांना सुंदर व सुवासिक फुलें येतात,
तर कांहीं नुसतीं उगवतात, वाढतात नि मरून जातात.
माणसांतहि—"कितीयेक ते जन्मले आणि मेले!"
आणि कांहीं 'मेले' परी 'कीर्तिरूपें उरले.'
असे जे कीर्तिरूपानें उरले,
त्यांनीं आपल्या आयुष्यांत—
कांहीं तरी नवीन करून दाखविलें.
छत्रपति शिवाजी महाराजांचें उदाहरण—
वडिलार्जित जहागिरींत त्यांचें समाधान नव्हतें.
त्यांना "कांहीं तरी नवेंच" करायचें होतें.
त्यांच्या त्या संकल्पांतूनच—
देश स्वातंत्र्याच्या सिंहासनावर आरूढ झाला.
प्रत्येकालाच शिवाजी होतां येणार नाहीं.
तरी पण "कांहीं तरी नवें" करून पहाण्याची
इच्छा, हिंमत, धडपड इतकें तर करतां येईल.
त्यासाठीं हीं उदाहरणें, कांहीं आदर्श!

कोंडी नवी नवेल करा : ?

# असा असतो देशभक्त

*

द. म. उतेकर
बी. ए. ( ऑनर्स )


म. पं. नं. ... शाळा.
दा. क. 9244 दि. 20।5।59
विषय वा. वा.

BVBK-0401255
BVBK-0401255

पन्नास नये पैसे



वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २



‘ देशभक्त ’ ही पदवी स्वतःला लावून घेणें किंवा दुसऱ्या कोणाला लावणें सोपें आहे. पण ती सार्थ ठरविणें मात्र सहजसाध्य नाहीं. देवाच्या भक्तीला तुकाराम महाराजांनीं ‘ सुळावरची पोळी ’ म्हटलें आहे; तशीच ही देशाची भक्तिहि खरोखरी सुळावरची पोळी आहे— निदान स्वातंत्र्यपूर्व कालांत ती तशी होती.

देशभक्ति ही बाहेरून स्वीकारण्यासारखी गोष्ट नाहीं; ती एक सहजप्रवृत्तीच असावी लागते. सत्ता—स्वार्थासाठीं देशभक्तीचा साज अंगावर चढवून देशाची खरीखुरी सेवा कधींच करतां येत नाहीं. लेकराला आईविषयीं जशी भक्ति तशी मातृभूमीविषयीं उत्कट भक्ति असेल आणि त्या भक्तीपायीं सर्वस्व गमावण्याचीहि तयारी असेल तरच ती खरी देशभक्ति.

हुतात्मा कोतवाल हें एक त्याचें उदाहरण.

श्री : ११६ : २

★

कांहीं तरी नवेंच
करा : १

© : १९६०
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

*

आवृत्ति दुसरी
१९६०

*

मूल्य ५० नये पैसे

★


प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा अँण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :

ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव पेठ,
पुणें—२.



आम्ही
डोंगर
चढलों
आणि
एका
कातळावर
आलों.
एकच
जयघोष
झाला--
'हुतात्मा
कोतवाल
झिंदाबाद'
'हिराजी
पाटील
झिंदाबाद.'

होय, हाच तो कातळ. हाच तो सिद्धगड. हीच ती जागा. याच जागीं २ जानेवारी १९४३ रोजीं पहाटें स्वातंत्र्यासाठीं घरादारांचा त्याग करून बाहेर पडलेल्या स्वातंत्र्यावीरांवर पोलिसांनीं गोळीबार केला होता. हीच ती जागा, जेथें 'देशभक्ति म्हणजे सुळावरची पोळी आहे' हें जगाला दाखवून हिराजी पाटील—एका अशिक्षित शेतकऱ्याचा एकुलता एक पुत्र—धारातीर्थी पडला होता. हेंच तें पवित्र ठिकाण, जेथें शौर्य, देशभक्ति हीं जातीवर अवलंबून नाहींत हें दाखवून देणारा नाभिक समाजांतील एक सुविद्य तरुण विठ्ठलराव कोतवाल स्वातंत्र्यवीरांचें नेतृत्व करतांना पोलिसांच्या गोळीला बळी पडला होता.

अशा या ठिकाणीं सिद्धगडावर स्वातंत्र्यासाठीं बलिदान करणाऱ्या त्या वीरांच्या स्मृतीस वंदन करण्यासाठीं शेंकडों लोक डोंगरदऱ्या तुडवून आले होते. स्वातंत्र्यवीरांच्या तुकडीचें नेतृत्व करणारे विठ्ठलराव कोतवाल यांच्यासंबंधीं जो तो आदराचे उद्‌गार काढीत होता. त्यांच्या शौर्याचें गुणगान करीत होता. त्यांच्या कामगिरीचे गोडवे गात होता. त्यांच्या संघटन—कौशल्याची स्तुति करीत होता. अशक्त माणसांत जमा होणाऱ्या व ज्यांच्या हातांत साधी काठी देखील कोणीं पाहिली नव्हती असे विठ्ठलराव कोतवाल. अशा माणसानें एवढ्या प्रबळ ब्रिटिश सत्तेशीं सामना कसा दिला ? एवढें बळ त्यांना कसें प्राप्त झालें ? खेड्यापाड्यांतील शेतकरी त्यांच्यामागें कसा आला ? —एका रात्रींत कांहीं हा चमत्कार घडून आला नाहीं! मग हें घडलें कसें ?

त्यासाठीं ह्या शूर वीराचा जीवनवृत्तान्तच आपणास पहावयास हवा.

**जन्म व बालपण :**

सह्याद्रीच्या कुशींत माथेरान गांव 'कोंकणपट्टीचें नंदनवन' म्हणून प्रसिद्ध आहे. याच ठिकाणीं १९१२ सालीं विठ्ठलराव लक्ष्मणराव कोतवाल यांचा जन्म झाला.

वयाच्या पांचव्या वर्षी माथेरानच्या मराठी शाळेंत विठ्ठल दाखल झाला. याच ठिकाणीं मराठी चौथ्या इयत्ते-पर्यंत त्याचें शिक्षण झालें. वर्गांतील अत्यंत हुशार विद्या-र्थ्यांत त्याची गणना होई. पण विठ्ठल म्हणजे केवळ पुस्तकांतील किडा नव्हता. अभ्यासाइतकाच खेळहि त्याला प्रिय असे. देशी-परदेशी हा भेद कळण्याइतकें हें त्याचें वय नव्हतें. पण कां कोण जाणे, त्याची ओढ असे ती देशी खेळांकडे. आटयापाटया हा त्याचा सर्वांत आवडता खेळ. त्याच्याबरोबरीचे वर्गांतील विद्यार्थी म्हणत, 'भरपूर खेळून नि जेमतेम अभ्यास करून ह्याचा पहिला नंबर राहतो तरी कसा ?'

'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' असें म्हणतात. पटेल तें बोलावें आणि जसें बोलावें तसें वागावें हें बालपणा-पासूनच विठ्ठलला माहीत. अन्याय दिसला कीं त्याविरुद्ध न्यायासाठीं झटावयाचें हा त्याचा बाणा. जें मोठेपणीं दिसलें तेंच बालपणीं. वर्गांतील कांहीं मुलांनीं गैरवर्तन केल्यामुळें गुरुजी एकदां बिथरले. रागाच्या भरांत त्यांनीं अपराधी मुलांबरोबर निरापराधी मुलांनाहि झोडपलें.

कांहीं गुन्हा नसतां त्यांत विठ्ठलहि सांपडला. विठ्ठलास हें सहन झालें नाहीं. तात्काळ तो म्हणाला, " माझा अपराध नसतांना मला शिक्षा केलीत, ती कां ? " विठ्ठलाचा हा स्पष्टवक्तेपणा म्हणजे आगींत तेल होतें. टेबलांतून चौदावें रत्न बाहेर काढून गुरुजींनीं विठ्ठलाचा यथेच्छ समाचार घेतला. विठ्ठलाला हा अन्याय अर्थातच सहन झाला नाहीं. पण त्यासाठीं त्यानें गुरुजींवर दांतओठ खाल्ले नाहींत किंवा रडत बसून आपला दुबळेपणाहि दाखविला नाहीं. निषेधाचा एक नवाच मार्ग त्यानें शोधून काढला.

दुसऱ्या दिवशीं शाळा भरली. गुरुजी वर्गांत आले. पण त्यांना वर्गांत काय दिसलें ? फक्त रिकामीं बाकें ! गुरुजींच्या अन्यायाचा निषेध म्हणून एकहि विद्यार्थी वर्गांत हजर नव्हता. या साऱ्या घटनेच्या मागें विठ्ठल कोतवाल आहे, हें ओळखावयास गुरुजींना वेळ लागला नाहीं. विठ्ठलचें नेतृत्व यशस्वी झालें होतें.

**शिक्षणासाठीं पुण्यास प्रयाण :**

मराठी चौथी इयत्ता माथेरानास झाल्यानंतर शिक्षणासाठीं विठ्ठल पुण्यास आपल्या आत्याकडे आला. त्या ठिकाणींहि त्याच्या तेजस्वी बुद्धीचा प्रकाश पडल्याशिवाय राहिला नाहीं. मराठी सातवीच्या ( व्ह. फा. ) परीक्षेंत पुणें जिल्ह्यांत तो पहिला आला.

हायस्कूलमध्यें अभ्यासासाठीं नेमलेल्या पुस्तकांचें वाचन तो काळजीपूर्वक करीच; परंतु ज्ञानाचा हव्यास घेतलेलें त्याचें मन तेवढ्यावर संतुष्ट कसें होणार ? विविध पुस्तकें

वाचून आपल्या ज्ञानांत भर घालण्याचा त्याचा प्रयत्न सतत चालू असे.

**विद्येनेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजीं ।**
**न दिसे एकहि वस्तू विद्येनेंहि असाध्य आहे जी ॥**

या जगांत माणसाला विद्येमुळें श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे, अशी त्याची श्रद्धा होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे शिवाजी महाराज, इटालीला स्वातंत्र्य मिळवून देणारा मॅझिनी, अमेरिकन स्वातंत्र्यासाठीं झटणारा जॉर्ज वॉशिंग्टन इ. थोरांच्या चरित्रविषयक चांगल्या पुस्तकांनीं त्याच्या अंतः-करणांतील प्रकाशाच्या खिडक्या सताड उघडल्या. माण-साच्या जन्माला येऊन आपल्या जन्माचें सार्थक करणारे हे महापुरुष त्याच्या दृष्टीनें दीपस्तंभ ठरले.

विठ्ठल मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाला. त्याच्या घरांत आनंदीआनंद झाला. विठ्ठलाला आतां चांगली नोकरी मिळेल, त्याला चांगला पगार मिळेल, त्याचा संसार सुखाचा होईल या मनोराज्यांत घरचीं माणसें दंग झालीं. पण विठ्ठलाला यांपैकीं कांहींहि नको होतें. त्याला हवें होतें तें शिक्षण. खूप खूप शिकावें असें त्याला वाटत होतें. त्याच्या ह्या विचारापासून त्याला परावृत्त करण्यासाठीं आर्थिक आणि इतर प्रापंचिक अडचणींचा डोंगर त्याच्यापुढें उभा करण्यांत आला. पण प्रबळ इच्छाशक्तीच्या माणसांना त्याचें काय ? अडचणींचे हे डोंगर का त्यांची वाट अडवूं शकतात ? ‘ इच्छा असेल तेथें मार्ग सांपडतो ’ हें घरच्या माणसांना माहीत नव्हतें. पण विठ्ठलाला तें चांगलें माहीत

होतें. त्यानें वाचलेल्या अनेक चरित्रग्रंथांचे नायक त्याला हेंच सांगत होते. पुढील शिक्षणासाठीं पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्यें विठ्ठलरावांनीं नांव दाखल केलें तें एका विशिष्ट हेतूनें.

**घरांतून बेपत्ता :**

१९३० सालचा हा काळ. गांधीजींची असहकारितेची चळवळ देशांत सुरू झाली होती. देशांत नवचैतन्य निर्माण झालें. हजारों विद्यार्थ्यांनीं शाळा-कॉलेजें सोडलीं आणि चळवळींत उडी घेतली. देशभक्तीचें एकच वेड त्यांना लागलें होतें. पारतंत्र्याच्या बेड्यांनीं जखडलेल्या मातृभूमीच्या आर्त हाकेनें ते अस्वस्थ झाले होते. कांहीं 'शहाण्या' लोकांना त्यांचें हें वेड पसंत नव्हतें.

**वेडे म्हणुनी कितिकजणांनीं तेव्हां त्या दूषियलें ॥**

पण त्यांना त्याची पर्वा नव्हती.

गांधीजींच्या सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेण्याची चढाओढ लागली. त्यासाठीं वाटेल ते हाल सहन करण्याची त्यांची तयारी होती.

**साहुनि लाठीमार, कायदे भंगुनिया प्रत्यहीं ।**
**सत्तेसंगें झुंज खेळले निर्भय सत्याग्रही ॥**

'आपलें जीवन कांहींतरी करण्यासाठीं आहे,' असें समजणाऱ्या विठ्ठलरावांना अशा वेळीं स्वस्थ कसें बसवेल?

आणि मग एके दिवशीं कॉलेजच्या पहिल्या वर्षाचा अभ्यास करणारे विठ्ठलराव एकाएकीं बेपत्ता झाले! घरच्या मंडळींच्या तोंडचें पाणी पळालें. विठ्ठलराव गेले

कोठें? सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. गांवोगांव तारा नि माणसें रवाना झालीं. माणसें विठ्ठलरावांना शोधीत होतीं. पण विठ्ठलरावांना आपल्या घराचेंहि विस्मरण झालें होतें. ते दुसऱ्याच एका क्रांतिकारक विचारांत आपल्या सहकारी मित्रांसह दंग होते. त्यांचा विचार चालला होता. हिंदुस्थान परतंत्र केला कोणीं? ह्या गोऱ्यांनींच ना. त्याचें शोषण करणारे कोण? हे गोरेच नाहीं का? बस् तर! ह्या वडचा गोऱ्या अधिकाऱ्यांना यमसदनास पाठविणें हेंच देशाच्या दृष्टीनें आपलें कर्तव्य. विचार ठरला आणि तयारी सुरूहि झाली. नंतर काय झालें असेल तें असो पण आरंभींचा हा जहाल विचार पुढें रद्द झाला व विठ्ठलराव मुंबईच्या काँग्रेसभवनांत गेले. तेथें स्वयंसेवक म्हणून ते नांव नोंदवितात तोंच घरचा मनुष्य दत्त म्हणून त्यांच्यापुढें उभा! शोधास आलेल्या मंडळींनीं ‘समजुती’च्या चार गोष्टी सांगून आणि आपलें वडिलकीचें दडपण त्यांच्यावर आणून त्यांना त्यांच्या विचारापासून तात्पुरतें परावृत्त केलें.

## ‘माधुकरी मागेन पण शिकेन’ :

कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतां विठ्ठलराव सुट्टींत बहुधा माथेरानास येत असत. सुटींत घरीं आले कीं, घरच्या मंडळींचा त्यांच्यामागें एकसारखा ससेमिरा लागा-वयाचा. सर्वांचें म्हणणें एकच—‘बस्स झालें आतां शिक्षण. आपले वाडवडील कुठें शिकले होते? आपला घरचा न्हाव्याचा धंदा सोडून हा उपद्व्याप कशाला?’ पण

प्रत्येक वेळीं विठ्ठलरावांचें एकच उत्तर ठरलेलें असावयाचें—'मला शिकावयाचें आहे. माधुकरी मागेन पण शिकेन.'

**सुटीचा उपयोग :**

घरांत अशी परिस्थिति असली तरी त्यांतच कुढत न राहतां त्यांच्या मनांत निरनिराळ्या योजनांचा विचार चालूंच असे. आपण लोकांच्या उपयोगी पडावें, आपल्या ज्ञानाचा सत्कार्यासाठीं उपयोग करावा, आपल्या कुवती-प्रमाणें देशाची सेवा करावी हाच विचार त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. हवा खाण्यास आलेले लोक पावसाळ्याच्या सुरवातीस निघून गेले कीं मग माथेरानच्या लोकांना पावसाळीं भरपूर वेळ मिळतो. मिळत असलेल्या ह्या वेळाचा चांगला उपयोग व्हावा म्हणून चांगल्या पुस्तकांचें वाचन करावें, चांगल्या विषयावर चर्चा करावी, आवडत्या गोष्टींचा व्यासंग वाढवून त्यांत प्रगति करावी असें त्यांना वाटे. ह्या गोष्टी केवळ सांगून ते गप्प बसत नसत तर त्याप्रमाणें प्रत्यक्ष कामास प्रारंभ व्हावा अशी त्यांची खटपट असे.

'आधीं केलें मग सांगितलें' या वृत्तीनें ते वागत. त्यामुळें त्यांच्या म्हणण्याचा लोकांवर परिणाम होई. लग्नकार्यांत अनावश्यक खर्च टाळावा असें म्हणणाऱ्या विठ्ठलरावांनीं समाजांतील लोकांचा विरोध पत्करूनहि आपल्या धाकट्या बहिणीचें लग्न वैदिक पद्धतीनें करून दाखविलें. सहभोजनाचें महत्त्व नुसतें ते सांगत बसले नाहींत, तर तें प्रत्यक्ष घडवूनच आणलें. श्रमाची लाज

बाळगण्यात मोठेपणा आहे, असें मानणाऱ्या लोकांची केवळ समजूत काढण्यांत त्यांनीं काळ घालविला नाहीं. कॉलेज-मध्यें शिकणारे विठ्ठलराव माथेरानास आले म्हणजे आपल्या स्नेह्याच्या हॉटेलांतील लहानसहान कामेंहि करीत. हें त्यांचें कामच किती बोलकें होतें ! अशा माणसाबद्दल कोणाला आदर वाटणार नाहीं ?

**बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें ॥**

**पहिली नोकरी :**

इंटरमध्यें असतांनाच इंदिराबाईशीं त्यांचा विवाह झाला. १९३३ सालीं इंटर पास झाल्यानंतर घरच्या माणसांचें फारच टुमणें मागें लागलें म्हणून नाइलाजास्तव त्यांनीं नोकरी धरली खरी; पण त्या ठिकाणीं त्यांना मानसिक स्वस्थता कशी ती मिळेना. आणि ती मिळणार तरी कशी ? प्रगतीचा ध्यास लागलेले विठ्ठलराव आपलें पुढील शिक्षण कसें होईल याच विवंचनेंत सतत असत. कोणताहि व्यवसाय विठ्ठलरावांच्या दृष्टीनें कमी प्रतीचा नव्हता. पण कारकून होण्याकरितां विठ्ठलराव जन्मास आले नव्हते. त्यामुळें निर्जीव आंकडेमोडींत तासन् तास घालविण्यांत त्यांचें मन रमेना. ‘जें कांहीं’ करावें असें त्यांना वाटत होतें, तें हें काम नव्हतें एवढें खरें.

आणि एक दिवस त्यांच्या मनासारखें घडलें ! वरिष्ठां-कडून त्यांना हवा असलेला नोकरींतून मुक्त केल्याचा हुकूम मिळाला ! नोकरींतून कमी झाल्याचें माणसाला दुःख होतें; पण ‘बरें झालें देवा गेली ती नोकरी’ असें म्हणून विठ्ठलरावांना मात्र आनंदच झाला !

**दुसरी अल्पजीवी नोकरी :**

मारूनमुटकून कारकून बनलेले विठ्ठलराव नको असलेल्या चाकोरींतून मुक्त झाले. नोकरीच्या जीवनाला अशा प्रकारें विराम मिळाला. पण तो अर्धविराम होता, पूर्णविराम नव्हे. नोकरी सुटल्यानंतर पुन्हां एकदां आपल्या आवडत्या विद्यार्थिजीवनास त्यांनीं प्रारंभ केला. बी. ए.च्या वर्गांत नांव दाखल केलें खरें; पण वर्षाच्या आंतच त्यांना आपला आवडता विद्याव्यासंग तात्पुरता दूर ठेवणें भाग पडलें. दुसरी नोकरी पत्करावी लागली. शिक्षणांत खंड पडला. मात्र शिक्षण घेण्याचा त्यांचा निर्धार अखंड होता. जों जों अडचणी अधिक तों तों त्यांना अधिक स्फुरण येत होतें.

त्यामुळें नाइलाजास्तव पत्करलेल्या दुसऱ्या नोकरींत त्यांचें लक्ष लागेना. मोठी मानाची नोकरी मिळवून सुखानें आयुष्य व्यतीत करण्यापेक्षां आपल्या दुःखी भारतमातेचें दुःख हलकें करण्यास आपण हातभार लावावा असें त्यांना वाटत होतें. भारताचा अन्नदाता गांजलेला शेतकरी त्यांना दिसत होता. त्याचें दुःख कमी करण्यासाठीं कांहींतरी करावें असें त्यांना एकसारखें वाटत होतें.

**अडलें जाकसलें जाणावें । येथानुशक्ति कामास यावें ॥**

ही त्यांची मनीषा होती. हें कार्य पार पाडण्यासाठीं त्यांना तयारी करावयाची होती. त्यासाठीं शिक्षणाची आवश्यकता होती. अखेरीस त्यांनीं निर्णय घेतला. नोकरीला पूर्णविराम दिला आणि पुण्यास वाडिया कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत नांव दाखल केलें.

## बी. ए. चा आनंद केव्हां ?

१९३७ सालीं विठ्ठलराव चांगल्या प्रकारें बी. ए. उत्तीर्ण झाले. आईबापांना साहजिकच आनंद झाला. मित्रमंडळींनीं त्यांचें अभिनंदन केलें. पण स्वतः विठ्ठलरावांना काय वाटलें ? परीक्षा पास झाल्यानंतर कोणाहि विद्यार्थ्याला होईल तसा आनंद विठ्ठलरावांनाहि झाला. पण त्यांच्या दृष्टीनें तो आनंद अपुरा होता. पदवीधर होण्याचें पुरेपूर समाधान त्यांना मिळणार होतें, पण केव्हां ? जेव्हां आपण मिळविलेली विद्या लोकहितासाठीं उपयोगी पडत आहे, असें त्यांना म्हणतां आलें असतें तेव्हां.

## वकिलीचा अभ्यास कशासाठीं ? :

सार्वजनिक कामांत पडल्यापासून कायद्याच्या ज्ञानाची आवश्यकता वेळोवेळीं विठ्ठलरावांना वाटूं लागली. त्यासाठीं आपण एल्‌एल्. बी. झालेंच पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यासाठीं मुंबईस जाण्याचाहि योग आला.

मुंबईस लॉ कॉलेजमध्यें त्यांनीं नांव दाखल केलें. त्यांचा कायद्याचा अभ्यास हा पैसा मिळविण्यासाठीं नव्हता. लोकसेवेसाठीं त्याची आवश्यकता त्यांना वाटली म्हणून ते तो करीत होते. त्यामुळें कॉलेजच्या वेळेव्यतिरिक्त मुंबईतील आर्थिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या लोकांत ते काम करीत. ह्या काळांत समाजसत्तावादावरील पुस्तकांचें अध्ययनहि त्यांनीं केलें. ज्या लोकांत आपणास काम करावयाचें आहे, त्या लोकांच्या जीवनाची त्यांनीं अगदीं जवळ जाऊन ओळख करून घेतली. हातीं घेतलेलें काम

शक्यतों निर्दोष व्हावें अशी त्यांची इच्छा असे. त्यामुळें कोणत्याहि प्रश्नाच्या अंगोपांगांचा सूक्ष्म अभ्यास करण्याची त्यांची दृष्टि असे.

लॉ कॉलेजला फणसवाडींतून त्यांना जावें लागे. आणा-दोन आणे ट्रामचा खर्च वांचविण्यासाठीं ते पायींच जात. आर्थिक अडचणी त्यांच्यापुढें सतत आ वासून उभ्या असत. पण केवळ त्यासाठीं हे आणा-दोन आणे वांचविले जात नसत. आपल्या आवडीचीं पुस्तकें विकत घेण्यासाठीं ह्या अशा प्रकारें वांचविलेल्या पैशांचा ते विनियोग करीत. हातीं फारसा पैसा कधीं नसावयाचाच. पण असेल तेव्हां सत्कारणीं त्याचा उपयोग कसा करतां येईल, याचा विचार ते करीत.

## वकिलीचें समाधान केव्हां ? :

१९३९ सालीं विठ्ठलराव एल्एल्. बी. ची परीक्षा चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाले. विठ्ठलराव वकील झाले. माथेरानचा पहिला वकील म्हणून माथेरानच्या जनतेनें त्यांचें सहर्ष अभिनंदन केलें. आतांतरी विठ्ठलराव सुखानें आयुष्य व्यतीत करतील असें प्रत्येकाला वाटूं लागलें.

पण सगळ्यांना जें वाटत होतें तसें करायला विठ्ठल-रावांचें मन तयार नव्हतें.

**दुसऱ्याचे दुःखें दुखवावें। परसंतोषें सुखी व्हावें ॥**

अशा मताचे विठ्ठलराव. त्यांना लोकांची ही विचार-सरणी कशी मान्य होणार ? माथेरानला गांवकऱ्यांनीं या

निमित्तानें जो सत्कार घडवून आणला, त्या प्रसंगीं विठ्ठलरावांनीं आपलें मनोगत उघड केलें. ते म्हणाले, " मी वकील झालों. यापुढें मी वकीलपत्रें घेईन. कोर्टांत जाईन. वकिली करीन. त्यामुळें मला समाधान लाभेल. हें समाधान चार पैसे मिळाल्यामुळें लाभणारें नाहीं. कारण ज्यांची वकिली मीं करावी अशी माझी इच्छा आहे, ते गरीब शेतकरी मला काय देणार ? त्यांच्यापासून मी काय अपेक्षा करणार ? परिस्थितीनें पीडलेल्या शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठीं, त्यांच्या जीवनांत अल्पसें कां होईना पण समाधान निर्माण करण्यासाठीं माझें वकिली ज्ञान उपयोगी पडावें अशी माझी इच्छा आहे. आणि तसें कांहीं झालें तर त्यांतच मला खरें समाधान मिळणार आहे. "

**शेतकऱ्यांचा वकील :**

आपली वकिली मोठ्या शहरीं राहून करण्यापेक्षां कुलाबा जिल्ह्यांतील कर्जतसारख्या लहानशा गांवींच करावयाचें त्यांनीं ठरविलें. याचें कारण पैसा अधिक मिळवून देणारी जागा शोधण्यापेक्षां शेतकरी अधिक मिळणारी जागा त्यांना पाहिजे होती हेंच होय.

कर्जत तालुक्यांतील शेतकऱ्यांमध्यें यापूर्वींच त्यांनीं कामास प्रारंभ केला होता. शेतकऱ्यांची संघटना करून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्याचें काम वकील होण्यापूर्वीं केव्हांच सुरू झालें होतें. तरीपण झालेली संघटना अधिक बळकट व्हावी नि शेतकऱ्यांमध्यें प्रभावी सामर्थ्य निर्माण व्हावें याकरितां आणखी प्रयत्न होणें

जरूरीचें होतें. यासाठीं कर्जत हें गांव त्यांना सोयीचें वाटलें.

त्यांनीं दोन वर्षें अक्षरशः शेतकऱ्यांचीच वकिली केली. एखादा शेतकरी त्यांच्याकडे आला आणि सावकारी छळाचें हृदयभेदक वर्णन भरल्या डोळ्यांनीं करूं लागला कीं विठ्ठलरावांनीं त्याचें वकिलपत्र घेतलेंच. फीचा प्रश्नच नव्हता. कित्येक वेळीं स्टँपकरितां लागणारे पैसे देखील विठ्ठलराव आपल्या पदरचे देत. त्या खर्चाच्या वसुलीचा प्रश्नच होता कुठें ? कारण तो पैसा शेतकऱ्यांच्या हितासाठीं खर्च होत होता ना ! विठ्ठलराव अशा वेळीं शक्य ती झीज स्वखुषीनें सोशीत.

शेतकऱ्यांच्या हितासाठीं कोर्टांत त्यांच्या बाजूनें लढणाऱ्या विठ्ठलरावांच्या—अण्णासाहेब कोतवालांच्या—मृत्यूची वार्ता ऐकून कर्जत तालुक्यांतील शेतकरी रडले तें का उगीच ?

## शेतकऱ्यांचे भाई :

शेतकऱ्यांच्या हितासाठीं कुलाबा जिल्ह्यांत जे कांहीं प्रयत्न झाले, त्यांमध्यें धान्यकोठचा व व्हॉलंटरी स्कूलसचा जरूर उल्लेख करावयास हवा.

भारतांतील बहुसंख्य शेतकऱ्यांना स्वतः जमीन कसूनहि पोटभर मिळत नाहीं. जमीन कसून शेतकऱ्याला जें मिळे त्यांतील बहुतेक धान्य खंड वगैरेच्या रूपानें सावकाराकडे जाई. राहिलेलें धान्य इतकें अल्प असे कीं तें दुसऱ्या हंगामापर्यंत कुटुंबाला पुरेसें नसे. त्यामुळें धान्य संपलें कीं शेतकऱ्याला सावकाराचे पाय धरावे लागत. आणि सावकाराकडून मिळणारें धान्य वर्षअखेरीस दिढीदुपटीनें फेडावें

लागे. म्हणजे वर्षअखेर शेतकऱ्याला मिळालेलें धान्य हें सावकाराच्याच पदरीं पडायचें आणि मुळांतच अर्धपोटीं असलेल्या शेतकऱ्याला उपाशी राहण्याची पाळी यायची.

शेतकऱ्यांची अशा प्रकारें होणारी पिळवणूक थांबावी म्हणून कुलाबा जिल्ह्यांत धान्यकोठ्यांची स्थापना झाली. शेतकऱ्याला लागेल तें धान्य देऊन वर्षअखेर अत्यल्प वाढीनें तें धान्य त्याजकडून वसूल करावयाचें, धान्यकोठींत जमा करावयाचें नि परत अधिकाधिक शेतकऱ्यांची सोय लावण्यासाठीं तें धान्य परत वांटलें जावयाचें अशी ही योजना होती. शेतकऱ्यांसाठींच आपलें आयुष्य आहे असें मानणाऱ्या विठ्ठलरावांनीं आपल्या शेतकऱ्यांना उपास घडून सावकाराचे पाय धरावे लागूं नयेत म्हणून या धान्यकोठ्यांसाठीं पराकाष्ठेची मेहनत घेतली.

निरक्षर शेतकऱ्यांची नाना प्रकारें फसवणूक होई. त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा करून घेतला जाई. खोटे कागद तयार करून शेतकऱ्याला नाडलें जाई. त्यासाठीं त्यांच्यांत शिक्षणप्रसार होणें आवश्यक होतें. व्हॉलंटरी स्कूलसची योजना त्या दृष्टीनें आंखण्यांत आली. कर्जत तालुक्यांतील व्हॉलंटरी स्कूलसच्या चिटणिसाचें जबाबदारीचें काम विठ्ठलरावांनीं स्वीकारलें. त्यानिमित्त खेडोपाडीं मिळेल तें खाऊन विसावा न घेतां उन्हातान्हांत फिरतांना विठ्ठलरावांनीं पादत्राणांबरोबर आपला देहहि झिजविला.

आधींच जेमतेम असणारी त्यांची प्रकृति अशा ह्या दगदगीमुळें फारच खंगत असे. खेडोपाडीं फिरतां फिरतां ते कधीं माथेरानास आले म्हणजे त्यांचे स्नेही म्हणत,

'काय हो विठ्ठलराव किती त्रास घेतां हा! प्रकृतीकडे तरी लक्ष द्या.' विठ्ठलराव यावर फक्त हसत. जनसेवेंत देह झिजविण्यांतच माझ्या जीवनाचें सार्थक आहे, असेंच जणूं त्यांना म्हणावयाचें असे.

१९४१ सालीं भरलेल्या कर्जत तालुका शेतकरी परिषदेमध्यें 'विठ्ठलराव कोतवाल हे शेतकऱ्यांचे खरेखुरे भाई आहेत' असा जो त्यांचा गौरव झाला तो अगदीं सार्थ होता.

### अण्णांचा 'परमेश्वर':

कर्जत येथील त्यांचें राहतें घर म्हणजे शेतकऱ्यांचेंच घर होतें. येणाऱ्याजाणाऱ्या पाहुण्यांची तिथें सारखी वर्दळ असावयाची. हे पाहुणे कोण होते ? त्यांत कोणी सुटाबुटांत आलेला नसायचा. लंगोटी लावलेले, डोक्यावर फाटकें मुंडासें, अंगांत कोपरी, हातांत काठी आणि असलेंच तर फाटकें पायतण अशा अवतारांत आलेले ते शेतकरी असावयाचे. अण्णांच्या भेटीस आल्यावर काळजीनें करपलेल्या त्यांच्या गालांवर क्षणभर मोकळें हसूं विलसूं लागे. अण्णांच्या भेटीला येणें म्हणजे प्रत्यक्ष देवाच्या भेटीला आल्यासारखेंच त्यांना वाटे. आपल्या अडीअडचणी अण्णांच्या कानांवर घातल्या कीं त्या निवारण होण्याचा प्रयत्न होईल, आपणास योग्य सल्ला मिळेल अशी त्यांची खात्री असे.

आणि इकडे शेतकरी पाहिला कीं, विठ्ठलरावांना परमेश्वर भेटल्यासारखा आनंद होई. ह्या परमेश्वराच्या कृपेवर तर आज चाळीस कोटि हिंदी जनता जगते आहे, तेव्हां ह्या परमेश्वराची सेवा करणें हें आपलें परमकर्तव्य अशी

त्यांची भावना होती. त्यांच्या मतें देशाचा खरा अन्नदाता, खरा धनी शेतकरी. उद्यांच्या भारताचा खरा राजा तोच.

**जे कुणि नांगर घेऊन खपती**
**घाम गाळुनी अन्न पिकविती**
**उपाशीच राहून आणिती—**
**उद्या स्वप्न खरेंचें**
**त्यांचें राज्य उद्यांचें !**

असा हा शेतकरी. त्याची खरी योग्यता त्याला प्राप्त व्हावी अशी विठ्ठलरावांची इच्छा होती. त्यासाठीं झटावें अशी त्यांची तळमळ होती.

**हिंदुस्थान व्यायाम मंडळ :**

बलोपासनेचें लोकांना महत्त्व पटावें व त्यांनीं बलोपासना करावी यासाठीं माथेरान येथील जुन्या आखाड्यासच पद्धतशीर स्वरूप देऊन 'हिंदुस्थान व्यायाम मंडळा'ची स्थापना करण्यांत आली. व्यायामशाळेंतील मुलांना खेळांची गोडी लागावी, अधिकाधिक मुलांनीं व्यायामशाळेचा उपयोग करून घ्यावा म्हणून विठ्ठलराव माथेरानास असले कीं व्यायामशाळेंत जात. मुलांत मिसळत. त्यांच्याबरोबर आटयापाटया खेळत, हुतूतूत भाग घेत. मुलांशीं खेळून, 'युक्तीच्या चार गोष्टी' त्यांना सांगून त्यांनीं मुलांचें प्रेम संपादन केलें. मुलांना व्यायामाची गोडी लावली. व्यायाम मंडळाचा विकास घडवून आणला.

**श्रीशिवाजी वाचनालय :**

माथेरानच्या जनतेच्या प्रगतीसाठीं करण्यांत आलेला आणखी एक प्रयत्न म्हणजे श्रीशिवाजी वाचनालयाची

स्थापना हा होय. प्रतिक्षणीं जगांत काय घडामोडी चालल्या आहेत, विविध क्षेत्रांत जगाची घोडदौड कशी चालू आहे हें माथेरानच्या लोकांना कळावें आणि त्यांच्या विचाराला चालना मिळावी, प्रगतीचा ध्यास त्यांना लागावा, जगाबरोबर धांवण्याची ईर्षा त्यांच्यांत उत्पन्न व्हावी यासाठीं विविध वाचनाची आवश्यकता होती. श्रीशिवाजी वाचनालय स्थापण्यामागें तोच हेतु होता. वाचनालयाची स्थापना झाल्यानंतर तें वाढविण्यासाठीं विठ्ठलरावांनीं खूपच परिश्रम घेतले.

**माथेरान सहकारी पतपेढीची स्थापना :**

माथेरानच्या जनतेला व्यापारउदिमाकरितां लागणारें भांडवल शें. १२ ते ३६ इतक्या प्रचंड व्याजाच्या दरानें काढावें लागे. आणि शेवटीं सावकाराचें व्याज फेडतां फेडतांच नाकीं नऊ येऊन मुद्दल हें वंशपरंपरेनें कायमच राहावयाचें ! जनतेची व्याजापायीं होणारी ही पिळवणूक नाहींशीं व्हावी यासाठीं माथेरान सहकारी पतपेढीची स्थापना करण्यांत आली.

**माथेरान नगरपालिकेंत :**

जनसेवेच्या उदात्त हेतूनें माथेरानांत आणि अन्यत्र अशीं विविध कार्यें करीत असतांना आणि त्यापूर्वींहि माथेरान नगरपालिकेंतील गोंधळाचा कारभार विठ्ठलराव अवलोकन करीत होते. नगरपालिकेंतील हा सावळागोंधळ नष्ट करण्याकरितां आणि जनतेची भरीव सेवा करण्याकरितां नगरपालिकेंत शिरण्याचें विठ्ठलरावांनीं ठरविलें. जनतेपुढें त्यांचें आजपर्यंतचें कार्य होतेंच. प्रचंड बहुमतानें १९४१

सालीं माथेरान नगरपालिकेंत ते निवडून आले. त्यांची कार्यतत्परता आणि जनसेवा लक्षांत घेऊन सुरवातीसच उपाध्यक्षपदीं त्यांची निवड करण्यांत आली. अवघ्या २९ वर्षांचा नगरपालिकेचा उपाध्यक्ष ही गोष्ट माथेरानांत तरी नवीन होती. त्यांतहि विठ्ठलराव हे नाभिक समाजांतील लोकांना तो एक कौतुकाचा विषयच झाला.

विठ्ठलरावांच्या आगमनानें नगरपालिकेंत एक नवचैतन्य निर्माण झालें. आपल्या कामगिरीनें विरोधकांचेंहि त्यांनीं समाधान केलें. माथेरान नगरपालिकेला खरीखुरी जनतेची नगरपालिका बनविण्यास त्यांनीं प्रारंभ केला.

**बाह्य सौंदर्यापेक्षां अंतःसौंदर्य श्रेष्ठ :**

विठ्ठलराव एकाद्या कामांत गुंतले म्हणजे त्यांना अन्नपाण्याची आठवण रहात नसे, तर मग आपली दाढी फार वाढलेली आहे याचें स्मरण त्यांना कुठलें व्हायला ? अशा वेळीं त्यांची परिचित मंडळी भेटली म्हणजे म्हणत, 'विठ्ठलराव आतां तुम्ही वकील आहांत, कार्यकर्ते आहांत. तेव्हां कपडे, दाढी याकडे तरी लक्ष द्या.' विठ्ठलराव केवळ हसत. त्या हसण्यांतच त्यांचें उत्तर असे.

दाढी करणें, केस कापणें ह्या गोष्टी कधींतरी सवडीनें ते करून घेत. साधेपणा म्हणण्यापेक्षां एका दृष्टीनें हा दोष होता. पण विठ्ठलरावांना कामाच्या महत्त्वांत तो गौण वाटे. पूर्वीपासूनच ह्या बाह्य डामडौलाकडे त्यांचें लक्ष नसे. लहानपणीं मुलें कपड्यालत्त्यांचा हट्ट घेतात. विठ्ठलरावांनीं तसें कधीं केलें नाहीं. वकील झाल्यानंतरहि

त्यांच्या अंगावर इस्तरीचे कपडे नेहमीं कधीं आढळले नाहींत. बाह्य सौंदर्यापेक्षां अंत:सौंदर्याकडेच त्यांचें अधिक लक्ष असे.

**नाभिक समाजांतील कार्य :**

मुंबईंत नाभिक समाजांतहि ते काम करीत. समाजानें काय केलें असतां त्याची उन्नति होऊन राष्ट्रकार्यासहि त्याचा हातभार लागेल असा व्यापक दृष्टिकोन ठेवून समाजांतील त्यांचें कार्य चाले. नाभिक समाजाच्या निरनिराळ्या सभा व बैठकी यांमध्यें बोलत तेव्हां प्रत्येक वेळीं त्यांचे विचार शेवटीं आपल्या राष्ट्रावर स्थिर होत. समाजाचें हित पहातांना आपलें राष्ट्र दृष्टिआड करून चालणार नाहीं, ही नवी दृष्टि त्यांनीं समाजाला दिली. या व्यापक दृष्टिकोनांतून आपल्या नाभिक समाजाकडे पहाणारे विठ्ठलराव कोतवाल हेच पहिले कार्यकर्ते असावेत, असें नाभिक समाजांतील वजनदार लोकहि कबूल करतात.

मुंबई नाभिक शिक्षण संघाचे ते अध्यक्ष झाले तेव्हां अध्यक्ष म्हणजे सभेपुरता हजर रहाणारा एक प्रतिष्ठित गृहस्थ ही अध्यक्षाची भूमिका त्यांनीं बदलून टाकली.

समाजाच्या शिक्षणप्रसारासाठीं उभारलेला मदतफंड जमविण्यासाठीं हातांत चोपड्या घेऊन ते दारोदार हिंडले. ‘आपला व्यवसाय सांभाळूनहि समाज आणि देशकार्यासाठीं आपण कांहींतरी करणें जरूर आहे,’ याची जाणीव आपल्या पद्धतीप्रमाणें ते लोकांना करून देत.

नाभिक समाजानें कुलाबा जिल्ह्यांत वाशी येथें इ. स. १९४१ मध्यें भरलेल्या नाभिक परिषदेच्या अध्यक्षस्थानीं विठ्ठलरावांची योजना करून त्यांचा गौरव केला.

**आपली साधीसुधी मराठीच बरी :**

त्या वेळीं हिंदुस्थानची राजभाषा इंग्रजी होती. आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून इंग्रजीचें महत्त्व होतेंच. पण बसतां उठतां इंग्रजीशिवाय पाणी प्यायचें नाहीं या कांहीं आधुनिक सुशिक्षितांच्या विचारसरणीच्या ते विरुद्ध जात असत. आपल्या व्यवहारांतील प्रत्येक प्रांत इंग्रजीनें व्यापावा हें त्यांना पसंत नव्हतें. तशीच जरूरी असल्याशिवाय स्वत: ते इंग्रजी बोलत किंवा लिहीत नसत. स्वत:च्या बोलण्यांत इंग्रजीची भेसळ होऊं नये यावर त्यांचा कटाक्ष असे. एकदां एक सुशिक्षित मराठा गृहस्थाशीं चर्चा करीत असतां मराठी वाक्यांत इंग्रजी शब्दांची एकसारखी भेसळ करणाऱ्या या सद्गृहस्थांचें प्रवचन विठ्ठलरावांना आवडलें नाहीं. शांत आवाजांत हसत हसत ते म्हणाले, "यापेक्षां आपली साधीसुधी मराठीच बरी, नाहीं का ?" मर्मी घाव बसल्यामुळें तो बिचारा सर्दच झाला !

**पराक्रम जातीवर अवलंबून नाहीं :**

आपल्या विद्वत्तेचा जसा विठ्ठलरावांना गर्व नव्हता त्याप्रमाणेंच आपण नाभिक समाजांत जन्मास आलों म्हणूनहि त्यांना कधी पश्चात्ताप झाला नाहीं. आपण जातीनें न्हावी आहोंत ही गोष्ट ते कधींहि लपवून ठेवीत नसत. व्यक्तीची लायकी ही त्याच्या जातीधर्मावर अवलंबून नसून व्यक्तीच्या

पराक्रमावर ती अवलंबून असते ही गोष्ट विठ्ठलरावांना पटली होती. त्यामुळें स्वतःच्या बाबतींत ह्या जातीच्या भुताची त्यांना कधीं भीति वाटली नाहीं. दुसऱ्याच्या कार्याचें मूल्यमापन करतांनाहि हीच दृष्टि ते ठेवीत.

**सांसारिक जीवन :**

अशा प्रकारें सार्वजनिक काम करणाऱ्या ह्या कार्यकर्त्याचें सांसारिक जीवन कसें होतें हाहि कुतूहलाचाच विषय आहे.

त्यांचें लग्न झाल्यानंतर सुमारें आठ वर्षें ते हयात होते. त्यांतील निम्मीं वर्षें परत शिक्षणांत गेलीं नि बाकी राहिलेलीं सर्वच सार्वजनिक कामाकरितां इकडे तिकडे फिरण्यांत गेलीं. माणगांवला नोकरींत असतांना कांहीं महिने त्यांनीं बिऱ्हाड केलें होतें. आणि शेवटीं शेवटीं कांहीं दिवस आपला संसार थाटून ते कर्जतला राहात होते, एवढेंच.

सदा कार्यांत मग्न असलेल्या विठ्ठलरावांना सांसारिक सुख तें काय मिळणार? त्यांच्या एकुलत्या एका मुलाला पित्याचें सुख म्हणून जें म्हणतात, तें कितपत लाभलें हाहि प्रश्नच आहे. १९४२ च्या ऑगस्टमध्यें त्यांची धाकटी मुलगी वारली तेव्हां ते 'भूमिगत' होते.

माथेरानास किंवा इतरत्र कुटुंबीय मंडळींत ते फारसे मिळून मिसळून राहिले नाहींत. सार्वजनिक कार्याच्या विचाराला त्यांच्या जीवनांत प्रधान स्थान होतें. असें असलें तरी घरीं त्यांचें अजिबात लक्ष नव्हतें, असें नाहीं. वाडवडिलांच्या कर्जापायीं स्वतःचें घर जाण्याचा प्रसंग टळला तो केवळ विठ्ठलरावांनीं शहाणपणानें केलेल्या उपायानें.

एवढें खरें कीं, माथेरानास किंवा इतरत्र कुटुंबीय मंडळींच्या सहवासांत तरुणपणीं ते फारसे आलें नाहींत.

सबंध देश हेंच आपलें घर असें समजणाऱ्या विठ्ठलरावांनीं देशासाठीं महान् कार्य करण्याची वाट पहावी, यांत आश्चर्य कसलें ?

तशी संधि त्यांना लवकरच येणार होती. १९४२ साल उगवलें तें आगामी लढ्याची तुतारी फुंकीतच. त्यासाठीं देशाची तयारी चालली होती. विठ्ठलरावहि त्या दृष्टीनें तयारी करीत होते.

**'आतां स्वर्गांत भेटूं !'**

जुलै १९४२ च्या शेवटच्या आठवड्यांत ते माथेरानास आई-वडिलांना भेटावयास आले ते शेवटचेच. घरच्या मंडळींचा निरोप त्यांनीं घेतला.तो निरोप शेवटचाच होता याची काय बिचाऱ्यांना कल्पना! आपला अण्णा आतां आपणास कधींच भेटणार नाहीं अशी त्यांच्या मातेला शंका आली नाहीं. नव्हे, आतां आपण घरीं परत येणारच नाहीं असें त्यांचें त्यांना तरी वाटलें असेल कीं नाहीं, कोण जाणें !

माथेरानचा निरोप घेतांना त्यांच्या एका मित्रानें विठ्ठलरावांना विचारलें, 'काय विठ्ठलराव आतां आपली भेट कधीं ? ' तेव्हां ते हसत हसत म्हणाले, ' भेटलों तर तुरुंगांत, नाहींतर स्वर्गांत ! '

**' बातचित ':**

आतां जरा इकडे या. कुलाबा जिल्ह्यांतील कर्जत तालुक्यांतील एका खेड्यांत शेतकऱ्याच्या ह्या चंद्रमौळी

झोपडींत घोंगडीवर बसून कोणती 'बातचित' चालली आहे ? जवळच आलेल्या स्वातंत्र्यसंग्रामांत आपण काय करावयाचें याचा तर विचार चालला नसेल ? होय, तेंच खरें आहे. हे पहा हिराजी पाटील, गोमाजी पाटील मानिवली गांवाहून आले. इतरहि अनेक शेतकरी जमले. विचार करूं लागले. विठ्ठलरावांच्या प्रत्येक वाक्याबरोबर ह्या शेतकऱ्यांच्या डोक्यांत कांहींतरी नवा प्रकाश पडत आहे हें त्यांच्या चेहऱ्यांवरूनच आपण ओळखूं शकतों. विठ्ठलरावांच्या योजनेनुसार आपापसांत विचार ठरवून हे स्वातंत्र्यवादी शेतकरी आपल्या घरादारांवर पाणी सोडण्यास नि देशासाठीं सर्वस्व गमावण्यास तयार झालेले दिसतात.

तानाजी मालुसऱ्यासारखा हिराजी पाटील विठ्ठलरावांबरोबर जाण्यास तयार झाला. 'रणिं निघे निघे वीर झुंजार। स्वसुखावर हाणुनि लाथ !' शेलारमामासारखे वृद्ध गोमा पाटील हेहि विठ्ठलरावांबरोबर निघण्याची तयारी करूं लागले. इतरहि कित्येकजण निघाले. आपल्याजवळ असणाऱ्या सामर्थ्याची जाणीव विठ्ठलरावांनीं ह्या वीरांना करून दिली. त्यांची शौर्यपरंपरा त्यांना दाखवून दिली. जें त्या शेतकऱ्यांजवळ होतें पण पारतंत्र्यांतील वातावरणांत वाढल्यामुळें त्यांना दिसत नव्हतें तें विठ्ठलरावांनीं दाखविलें. एवढें झाल्यानंतर त्या शेतकऱ्यांचे बाहु स्फुरण पावल्यास नवल कसलें ? आपला पराक्रम दाखविण्यास योग्य वेळेचीते वाट पाहूं लागले. आणि तशी संधि लवकरच आलीहि !

## ‘भूमिगत’ झाले :

८ ऑगस्ट १९४२ च्या मंगलरात्रीं गांधीजींनीं देशाला चळवळीचा आदेश दिला. सरकारी गाडा बंद पाडण्यासाठीं आपल्या सहकाऱ्यांसह विठ्ठलराव बाहेर पडले. ९ऑगस्टला लोकांतून लोकनेत्यांना उचलून सरकारनें दडपशाहीस सुरवात केली. हजारों देशभक्तांना पकडण्यांत आलें. विठ्ठलरावांना पकडण्याकरितां कर्जतच्या त्यांच्या मुक्कामावर पोलिस तुकडी आली. पण विठ्ठलरावांची खोली मोकळी होती! पोलिसांची निराशा झाली. त्यांचा तपास करण्यांत पोलिस इकडे धामाधूम होत होते तर तिकडे ‘सरकारचें राज्ययंत्र खिळखिळें करण्याच्या तयारींत’ सह्याद्रीच्या आसऱ्यास ‘अज्ञात स्थळीं’ आपल्या शेतकरी वीरांबरोबर विठ्ठलराव दंग होते !

## ‘कुठें आहे तो कोतवाल ?’

हळूहळू बातम्या येऊं लागल्या—सरकारी दारूगोळा लुटला, बंदुका गेल्या, पोलिसांचे गणवेष नाहींसे झाले. अशा एक ना दोन. बातम्या येण्याचें प्रमाण वाढतच होतें. त्या प्रमाणांत सरकारची दडपशाहीहि वाढत होती. विठ्ठलरावांच्या मागें पोलिसांचा ससेमिरा लागला. पोलिसांच्या चपला फाटल्या, ऑफिसरांचे बूट झिजले पण विठ्ठलराव आहेत कोठें ? कित्येक पोलिसांनीं देवीला नवस केले. परमेश्वराची करुणा भाकली—‘नको रे देवा हा त्रास ! कुठें आहे तो विठ्ठल कोतवाल, तो एकदांचा सांपडूं दे.’ इतके पोलिस टेकीला आले. आज अमुक गांवीं विठ्ठलराव

आहेत असें पोलिसांना कळावें, त्यांनीं जय्यत तयारीनिशीं त्या गांवावर छापा घालावा आणि विठ्ठलराव सांपडले नाहींत म्हणून दांतओठ खात परत फिरावें ! त्यांच्या समोरून पालटलेल्या वेषांत विठ्ठलराव बेडरपणें निघूनहि जावयाचे. शेवटीं सरकारनें घोडेस्वारांची मदत घेतली. ज्या ठिकाणीं विठ्ठलरावांच्या चळवळीचें केंद्र आहे, असें सरकारला वाटत होतें त्या मानिवली गांवांत घोडेस्वारांना आणून सरकारनें वेढ्याची परिस्थिति निर्माण केली. कर्जत तालुक्यांत आणि विशेषतः मानिवली गांवांत आणलेल्या या घोडेस्वारांकडून अनन्वित अत्याचार झाले. शेतकऱ्यांचा जीव कीं प्राण असलेले विठ्ठलराव ! या शेतकऱ्यांचा छळ करून तरी विठ्ठलरावांचा शोध लागेल या आशेनें अधिकाऱ्यांच्या अक्षम्य अपराधांकडे सरकारनें दुर्लक्ष केलें. पण धन्य ते शेतकरी कीं ज्यांनीं विठ्ठलरावांच्या राष्ट्रकार्याला सहानुभूति म्हणून सरकारच्या छळालाहि शूरपणानें तोंड दिलें आणि ते कसोटीस उतरले.

**‘हजर व्हा, नाहींतर–’**

इकडे विठ्ठलरावांच्या घरीं माथेरानला नोटिसांवर नोटिसा लागत होत्या. ‘हजर व्हा नाहींतर सक्तमजुरी आणि प्रचंड दंड !’ सक्तमजुरीची शिक्षा ! ही का त्या वीराला कर्तव्यच्युत होण्याकरितां द्यावयाची धमकी ! केवळ तुरुंगांत जाऊन त्यागाचा शिक्का घेऊन मोठेपणा मिळविण्यापेक्षां प्रत्यक्ष कार्य करतांना मरण आलें तरी बेहत्तर अशा ईर्षेनें बाहेर पडलेले विठ्ठलराव या धमकीनें का सरकारपुढें हजर होणार होते ?

विठ्ठरावांवर लागलेल्या ह्या नोटिसा पाहून आणि त्यांनीं चालविलेल्या पराक्रमाचे वृत्तान्त ऐकून पुष्कळ लोकांना आश्चर्य वाटे. अगदीं साधे, फाटक्या अंगाचे, वरवर बावळट दिसणारे विठ्ठलराव इतकीं धाडसाचीं कामें करतात तरी कशीं, असें प्रत्येकाला वाटे.

पण विठ्ठलरावांचा सुकुमार दिसणारा देह किती काटक होता हें आतां लोकांच्या लक्षांत येत होतें. वरवर बावळट दिसणाऱ्या विठ्ठलरावांमध्यें सैनिक तयार करून लढा देण्याइतकी अभिजात शिपाईगिरी होती, हें प्रत्ययास येत होतें. वरवर शांत दिसणारा हा तरुण किती ' भयंकर ' आहे याची प्रचीति सरकारला याच वेळीं आली असावी. छातीवर गोळ्या झेलण्याची तयारी असलेल्या त्यांच्या निधड्या छातीची कल्पना याच वेळीं लोकांना येत होती. विठ्ठलरावांविषयींचा लोकांचा आदर वाढत होता आणि सरकारच्या अंगाचा तिळपापड होत होता !

## क्षुद्र स्वार्थासाठीं ?

पण अखेरीस-अखेरीस काय झालें ?

हिंदुस्थानच्या हाडींमासीं खिळलेला घरभेदेपणा—त्यानें आपलें डोकें वर काढलें. अल्प लोभापायीं स्वार्थासाठीं आपल्या घराची चोरांना वाट दाखवून विश्वासघात करणारा एक सूर्याजी पिसाळ निघाला. लोभाला तो बळी पडला. जंगजंग पछाडून एवढ्या बलाढ्य समजल्या जाणाऱ्या सरकारला जो रस्ता आजपर्यंत दिसला नव्हता तो रस्ता दाखविण्याचें पापकर्म करावयाचें त्यानें ठरविलें आणि. . . .तो काळदिवस जवळजवळ येत चालला ! !

**नवें वर्ष उदयास आलें—**

१९४२ साल भूतकाळांत टाकून नवें वर्ष उदयास आलें. नव्या वर्षाच्या नव्या उत्साहांत विठ्ठलरावांनीं आपल्या कार्याच्या कितीतरी नव्या योजना आंखल्या असतील. या नव्या योजना अमलांत आणण्यासाठीं सिद्धगडासारखें मध्यवर्ति ठिकाण त्यांनीं निवडलें असेल. ठाणें, कुलाबा व पुणें जिल्ह्याकडे एकाच वेळीं दृष्टि टाकतां येण्यासारखें हें ठिकाण होतें. मुंबईहून निघालेल्या माणसाला कल्याणवरून मुरबाडला आणि तेथून ३०–३५ मैलांवरील सिद्धगडला जातां येईल. नेरळवरून निघालेल्या माणसानें जातां जातां भीमाशंकराचें दर्शन घेऊन सिद्धगडावर जावें. कोठूनहि जा, कांहीं मैल प्रवास जंगलांतून केल्याशिवाय उभ्या डोंगरावर असलेल्या सिद्धगडावर तुम्हांला जातां येणार नाहीं. आजूबाजूस जंगल असलेली सिद्धगडासारखी निवान्त जागा आपल्या योजना आंखण्यास विठ्ठलरावांना सोयीची वाटली असेल. या ठिकाणीं आपल्या योजना आंखून प्रत्यक्ष कामाला लागण्यासाठीं निघण्याचा त्यांचा बेत झाला असेल. म्हणूनच त्यांनीं १ जानेवारी १९४३ ला नव्या वर्षाच्या मुहूर्तावर आपल्या सामानाची आवराआवर केली असावी. त्यांना काय कल्पना कीं आपल्या योजनांची धूळधाण उडविण्यासाठीं ठाण्याचे शेंकडों पोलीस रात्रीच्या वेळीं रानावनांतून दौडत येत आहेत !

**—आणि घात झाला !**

रात्र संपत होती. हिराजी पाटील सिद्धगडावर आपली बंदूक घेऊन संरक्षणार्थ पहारा करीत होता. इकडे ठाणा

पोलिस सुपरिन्टेंडेंट मि. हॉल व मि. स्ट्रॅफर्ड आपल्या निवडक पोलिसांसह त्या काळचा रात्रीं जंगल तुडवीत सिद्धगडाकडे धांवत होते.

मध्यरात्र उलटली. हिराजीचें पहारा करण्याचें काम डोळ्यांत तेल घालून चालूंच होतें. पहांट झाली. पायथ्याच्या वाडींतील कोंबडें आरवलें. तासा दोन तासांनीं हिराजी बंदूक खालीं ठेवणार होता. तोंच––

'ठोऽऽठोऽऽ' :

आजची रात्र निर्विघ्नपणें पार पडली म्हणून हिराजी आपली बंदूक खालीं ठेवून सुटकेचा निःश्वास टाकणार न टाकणार तोंच 'ठोऽऽठोऽऽ' बार ऐकूं आले. 'अयाऽऽई' एवढीच हिराजीनें शेवटची किंकाळी फोडली आणि तो कोसळला. गोळीनें त्याचा बळी घेतला होता. देशासाठीं घरादाराचा त्याग करून रानावनांतून भटकणारे ते वीर सावध झाले. आजूबाजूला जो तो पाहूं लागला. पण काय घडलें हें समजून घेण्यास त्यांना सवडच मिळाली नाहीं. बंदुकांतून सरसर सुटलेल्या गोळ्यांचा पाऊस सिद्धगडावर पडूं लागला.

**भारतमातेचा सुपुत्र हरपला !**

ती वेळ विचार करण्याची नव्हती. जिकडे रस्ता दिसेल तिकडे जो तो धावूं लागला. गोमा पाटलांना गोळी लागून ते जागचे जागीं खिळले गेले. पण जो 'पाहिजे होता' तो कुठें आहे ?

ते पहा विठ्ठलराव डोंगरकपारीस धरून वरवर जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. हॉलनें तें पाहिलें. त्यानें पिस्तुलाचा

चाप ओढला. कमरेखालीं गोळी लागून विठ्ठलराव जखमी झाले. तरी ते तसेच पुढें चालले. पण काय ? पाठोपाठ दुसऱ्या गोळीचें आगमन. तिनें आवेशांत येऊन मर्मावरच प्रहार केला. डोक्याची कवटीच उडाली. ज्या मेंदूतून देशप्रेमानें ओथंबलेल्या अनेक योजना बाहेर पडल्या, ज्या मेंदूनें शेंकडोंना देशप्रेमाचे धडे शिकविले त्या मेंदूच्या चिंधड्या चिंधड्या उडाल्या ! विठ्ठलरावांचे प्राण अनंतांत विलीन झाले. एक पराक्रमी वीर आपल्या देशबांधवांना प्रत्यक्ष कृतीनें त्यागाचा धडा शिकवून सोडून गेला. भारतमाता आपल्या एका सुपुत्रास मुकली !

**गाऊं त्यांना आरती :**

सिद्धगडावरील हुतात्मा कोतवालाचें स्मारक आज तुम्हांआम्हांला स्फूर्ति देण्यास खडें आहे. ' तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी ' असें आपणास सांगत आहे. प्रतिवर्षी २ जानेवारीस त्यांना श्रद्धांजलि वाहण्यासाठीं लोक तेथें जातात. त्यांच्या पवित्र स्मृतीस वंदन करतात. त्याच्यापासून स्फूर्ति घेतात. आणि त्यांचें गुणगान करीत परततात. आपणहि त्यांत सामील होऊं या--

" देह जावो देह राहो, नाहिं ज्यांना तत्क्षिती,
लोकसेवा दे रति ।
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती
गाऊं त्यांना आरती ॥

अ.क्र. ९२५५ दि. २
बा.वा.
BVBK-0401255
BVBK-0401255

# कुमार साहित्य माला

*'उत्कट भव्य तेंचि घ्यावें' ... असे संस्कार नव्या पिढीच्या मनावर व्हावेत; कुमारवयाच्या मुलांमुलींना ज्ञान आणि स्फूर्ति प्राप्त व्हावी; या हेतूनें चालू केलेली –*

माध्यमिक शाळांतील ग्रंथालयांची गरज लक्षांत घेऊन अत्यंत काळजीपूर्वक निवडलेलीं व संपादन केलेलीं हीं पुस्तकें आहेत.

हद्दपार : कादंबरी : १॥ रु.
हेन्री फोर्ड : चरित्र : २ रु.
ओंजळ : कथासंग्रह : १॥। रु.
कोनटिकी : साहसी प्रवास : २ रु.
राखेंतील निखारे : कादंबरी : १॥। रु.
उत्तरेकडील भिंती : चिंतन : १। रु.
ॲब्राहम लिंकन : चरित्र : १॥ रु.
माशाचे अश्रु : नवनीतकथा : १॥रु.
अंधारवड : कादंबरी : २ रु.
पहिली अखंड भरारी : १॥ रु.
विश्वाच्या कळसावर : २ रु.
शिल्पकार : व्यक्तिचित्रें : १। रु.
प्रवाळाच्या बेटांवर : २ रु.
वाघजईच्या जंगलांत : २ रु.
राइट-बंधु : चरित्र : २ रु.
घर-दार : शब्दचित्रें : २ रु.
चिरंजीव त्यांचें जगीं नाम राहे : १॥
सुभाषित-कथा : १ : १॥ रु.
अस्मत : सागरी शिकार-कथा : १। रु.
छोटा सरदार : २ रु.
दक्षिण ध्रुवाचीं क्षितिजें : २ रु.
सूडाची आग : २ रु.
कथांजलि : टागोर-कथा : १॥। रु.
सुभाषित-कथा : २ : १॥ रु.
दया तिचें नांव : कथा : १॥। रु.
पृथ्वी ते सप्तर्षिमंडळ : १॥ रु.
वनांतली वाट : कादंबरी : १॥। रु.
प्रेरणा : प्रेमचंद-कथा : १॥। रु.
म्हणी : अनुभवाच्या खाणी : २ रु.
दोन शिलेदार : कादंबरी : १॥ रु.
आषाढी-कार्तिकी : १॥ रु.
इतिहासाच्या पानोपानीं : १ : १॥ रु.
लंबदूम : एक बहारदार गोष्ट : १। रु
माध्य. शाळांतील सांस्कृतिक : २ रु.
अदृश्य माणूस : १॥ रु.
मंगळवाडी : कादंबरी : १॥ रु.
आव्हान : विज्ञान-कथा : ९० न. पैसे
ऐतिहासिक गुजगोष्टी : १ रु.
सावज : शिकार-कथा :
रघुवंश : अनुवाद
ग्रीक पुराण-कथा :
कादंबरी : अनुवाद

अशीं आणखी अनेक पुस्तकें प्रतिमास निघत आहेत. यादी मागवा.

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ३ राउंड बिल्डिंग, मुंबई २**

# कांहीं तरी नवेंच करा

*जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें*

**तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना**

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा.शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरिभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजेलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशियांतील )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई भी चीज उठाव : वूलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी-मुद्रण प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जिजाबाई :
२२. स्वदेशी कारखानदार : काळे
२३. भव्य स्थापत्य : लेसेप्स ( सुएज )
२४. सर्कस बहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला :
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमा-महर्षि : अण्णा
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंतफंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्कर
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमास
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४०. शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फांतला माणूस : जेम्स हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

**प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : प्रश्नपत्रिकेसह संच-पेटी २५ रुपये**

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ३ राउंड बिल्डिंग, मुंबई २**